| | |
|---|---|
| MHRG110013462022 | दाखल तारीख – २४.११.२०२२ |
| | नोंदणी तारीख – २४.११.२०२२ |
| | निकाल तारीख – २३.०३.२०२६ |
| | कालावधी – ०३ वर्षे, ०३ महिने, २९ दिवस |

## प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड यांचे न्यायालयात

**पिठासिन अधिकारी – श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५९९/२०२२ निशाणी क्र. २२/क**

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल क्रमांक | ३१५/२०२२ |
| गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | महाराष्ट्र सरकारतर्फे, माणगांव पोलीस ठाणे |
| निकालाचा दिनांक | २३.०३.२०२६ |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे, माणगांव पोलीस ठाणे |
| अभियोग पक्षातर्फे वकील | श्री. पी. जे. गावंड सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **बाळाराम राम कोळी**<br>वय – ३० वर्षे,<br>राहणार – म्हादपोली, मोर्बा ता. माणगांव, जि. रायगड. |

| | |
|---|---|
| आरोपीतर्फे वकील | श्री. वसीम दळवी. |

## भाग 'ब'

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ३१.१०.२०२२ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | ३१.१०.२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २४.११.२०२२ |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | २४.११.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२.०४.२०२३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | २३.०३.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोपीने केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाळाराम | सी.आर. | -- | मुंबई | निर्दोष | लागु | लागु नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राम कोळी | पी.सी. कलम ४१अ/ १ अन्वये नोटीस | | दारुबंदी कायदा कलम ६५(ई). | मुक्तता | नाही | |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | शिवाजी त्रींबक मिसाळ – साक्षीदार क्र.१ | ०७ | फिर्यादी |
| २. | अन्वर मोहीद्दीन धनसे – साक्षीदार क्र.२ | १९ | पंच |
| ३. | अयुब अब्बास बंदरकर – साक्षीदार क्र.३ | २० | पंच |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

### अ. अभियोगपक्ष –

| अनु. क्र. | स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | तक्रार | ०९ |
| २. | छापील प्रथम खबरी अहवाल | १० |

### ब. बचाव पक्ष –

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयीन निशाणी –

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक २३.०३.२०२६ पारित केला.)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवणेत आलेला आहे.

## <u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत</u>

२. सदर प्रकरणात एस. एस. मिसाळ, बक्कल नं.२२३८, पोलीस शिपाई हे फिर्यादी आहेत. दि.३१.१०.२०२२ रोजी फिर्यादी कर्तव्यावर असताना त्यांच्या वरिष्ठांच्या आदेशान्वये ऑल आउट ऑपरेशन सुरु झाले. फिर्यादी व त्यांचे सहकारी माणगांव हद्दीत खाजगी वाहनाने गेले. मौजे म्हादपोली आदिवासीवाडी येथे बाळाराम रामा कोळी हा अवैद्य गावठी दारु विक्रीचा धंदा करतो अशी त्यांना गुप्त बातमी मिळाली. म्हणून फिर्यादी व त्यांचे सहकारी छापा टाकण्यासाठी हम रस्त्याने जावुन बाळाराम कोळी याचे घराचे जवळ सायंकाळी १७.३० वा.सु. गेले. तेथे घराचे मागील बाजुस मोकळ्या जागेत आरोपी पांढ–या रंगाचा प्लॅस्टीकचा कॅन घेवुन बसलेला दिसला. आरोपीकडील दोन प्लॅटस्टीकच्या कॅनमध्ये गावठी हातभट्टीची दारु असल्याच दिसले. म्हणून एस. एस. मिसाळ यांनी आरोपीविरुध्द सरकारतर्फे फिर्याद दिली.

३. सदरच्या फिर्यादीप्रमाणे माणगांव पोलीस ठाणे गुन्हा नोंदणी क्र.३१५/२०२२ नोंदविला. गुन्ह्याचा तपास एस. जी. भोजकर, सहा. फौजदार यांनी केला. त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. जप्त मुद्देमालापैकी एक सिलबंद बाटली रासायनिक विष्लेषणासाठी पाठविली. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्ह्याचा आरोप नि.क्र.०७ वर नोंदविण्यात आला.

आरोपीने आरोप कबूल नसल्याचे सांगून त्यांची संपरिक्षा करण्याची विनंती केली. आरोपीने संपूर्ण घटना नाकारली व त्याचेविरुध्द खोटी फिर्याद दाखल केल्याचे कथन केले. अभियोग पक्षाचा सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र.२१ वर नोंदविण्यात आले.

**५.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता व अभियोग पक्षातर्फे श्री. पी. जे. गावंड सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. वसीम दळवी यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणाच्या निर्णयाप्रत पोहचण्याकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्द्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ३१.१०.२०२२ रोजी मौजे म्हादापोली, आदिवासीवाडी, ता. माणगांव, जि. रायगड येथे आरोपीने त्याच्या ताब्यात गावठी हातभट्टीच्या दारुचा साठा विना परवाना अवैधरित्या जवळ बाळगली व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |

२. काय आदेश ? अंतिम आदेशानुसार.

## कारणमिमांसा

**६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरीता तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी एस. एस. मिसाळ (सा.क्र.१), पंच अन्वर मोहीद्दीन धनसे (सा.क्र.२) पंच अयुब अब्बास बंदरकर (सा.क्र.३) यांची साक्ष अनुक्रमे नि.क्र.०७, १९, २० वर नोंदविण्यात आली आहे. अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वरील आदेशानुसार बंद करण्यात आला.

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

**७.** फिर्यादी एस. एस. मिसाळ (सा.क्र.१) यांनी सरतपासात असे कथन केले की, दि.३१.१०.२०२२ रोजी फिर्यादी कर्तव्यावर असताना त्यांच्या वरिष्ठांच्या ऑल आउट ऑपरेशनच्या आदेशाने फिर्यादी व त्यांचे सहकारी खाजगी वाहनाने म्हादापोली आदिवासीवाडी येथे दारुच्या अवैद्य विक्रीबाबत कारवाई करण्याकरिता गेले. घटनास्थळी सायंकाळी ०५.३० वा. घटनास्थळी आरोपीजवळ दोन पांढ–या रंगाचे कॅन आढळून आले. आरोपीने त्याचे नाव बाळाराम कोळी असे सांगितले. पांढ–या कॅनमध्ये दारु असल्याचे सांगितले व त्याच्याकडे दारु विक्रीचा परवाना नसल्याचे सांगितले.

८. उलटतपासामध्ये फिर्यादी एस. एस. मिसाळ (सा.क्र.१) यांनी मान्य केले की, फिर्यादी ज्या वाहनाने घटनास्थळी गेले त्या खाजगी

वाहनाचा क्रमांक केस डायरीमध्ये नमूद नाही. आरोपीच्या घराच्या मागे मोकळी जागा आहे तेथे कोणीही येवु जावु शकते. रासायनिक परिक्षणाचा अहवाल सदर प्रकरणामध्ये दाखल केला नाही.

९. अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार अन्वर (सा.क्र.२) व पंच साक्षीदार अयुब (सा.क्र.३) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, दि.३१.१०.२०२२ रोजीच्या पंचनाम्यावरील सही त्यांनी मान्य केली परंतु त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे सदर साक्षीदार यांनी नमूद केले आहे. सरकार पक्षाच्या बाजूने सहाय्य होईल असा पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही. या पंच साक्षीदारांचे साक्षी जबाबावरुन त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास मदत केली नाही. सबब, सदर पंच साक्षीदारांचा तोंडी पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

१०. अभियोग पक्षाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला आहे. अहवालावरुन रासायनिक परिक्षणासाठी पाठविण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये अल्कोहोलाचे प्रमाण आढळल्याचे दिसून येते. जरी त्यामध्ये ईथील अल्कोहोलचे अस्तीत्व असल्याचे दिसून येत असले तरी, प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त केला ही बाब जप्ती पंचांच्या साक्षीवरुन संशयापलिकडे सिद्ध होत नाही.

११. तसेच अभियोग पक्षाने मुद्देमालाचा मुद्देमाल मोरर (लिपीक) ज्याच्या ताब्यात जप्त मुद्देमाल ठेवला त्या मुद्देमाल मोरर यास अभियोग पक्षातर्फे तपासले नाही. तसेच अभियोग पक्षाने सदर मुद्देमाल मोररकडे जमा

करतेवेळी रजिस्टरला घेतलेली नोंद सिद्ध करण्याकरीता सदर रजिस्टरची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल हाच वैज्ञानिक प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठविला होता हे सिद्ध करण्याकरीता मुद्देमाल मोरर तपासणे आवश्यक होते व संबंधित रजिस्टरची नोंद अभिलेखावर आणणे आवश्यक होते. दिनांक ३१.१०.२०२२ रोजी मुद्देमाल जप्त केला असून तो दिनांक १३.११.२०२२ रोजी रासायनिक परिक्षणाकरिता पाठविण्यात आलेला आहे. सदरच्या १३ दिवसांच्या दरम्यान मुद्देमाल कोठे व कशा परिस्थितीत ठेवला होता याबाबत कोणताही पुरावा आलेला नाही. तसेच जप्त मुद्देमाल हाच वैज्ञानिक प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठविला होता हे अभिलेखावर संशयापलिकडे सिद्ध होत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा रासायनिक परिक्षणाचा अहवाल आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यास उपयुक्त ठरत नाही.

**१२.** अभियोगपक्षाने वर उल्लेख केलेल्या पोलीस साक्षीदाराशिवाय इतर कोणासही तपासले नाही. पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. तसेच घटनास्थळाची परिस्थिती पाहता केवळ पोलिस साक्षीदाराच्या साक्षीवरून आरोपीस दोषी धरण्या इतपत विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अशा परिस्थीतीत आरोपीवर ठेवलेला दोषारोप निर्विवादपणे सिद्ध होण्याइतपत सक्षम पुरावा या न्यायालयापुढे आलेला नाही. करीता सबब हे न्यायालय मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

मुद्दा क्रमांक ०२ बाबतः–

**१३.** अभियोग पक्ष या न्यायालयाने आरोपीवर निश्चीत केलेला मुं.वा.प्रोव्ही. ॲक्ट कायदा कलम ६५ (ई) अन्वयेचे दोषारोप आरोपीविरुद्ध निर्विवादपणे सिद्ध करण्यास असफल ठरलेला आहे. त्यामुळे पर्यायाने आरोपी ही निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल देशी दारु अपील कालावधी संपल्यानंतर कलेक्टर, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पाठविणे न्यायोचित आहे. वरील सर्व कारणांमुळे हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**अ.** आरोपी **बाळाराम राम कोळी** यास मुं.वा.प्रोव्ही. ॲक्ट कायदा कलम ६५(ई) अन्वये असलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**ब.** प्रस्तुत कामी जप्त असलेला मुद्देमाल दारु नाश केली नसल्यास विल्हेवाट लावण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने जप्त (Confiscate) केली नसल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे अपील कालावधीनंतर नाश करणेसाठी पाठविण्यात यावे.

**क.** आरोपीचे वैयक्तिक जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येते.

**ड.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ अ

प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चा जामीन द्यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.03.25 17:04:02 +0530

माणगांव, श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)

दिनांक : २३.०३.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव.